An International Multidisciplinary Half Yearly Research Journal

# GENIUS

Volume - VI, Issue - I, August - January - 2017-18

ISSN 2279-0489

Impact Factor - 4.248 (www.sjifactor.com)

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

Is Hereby Awarding This Certificate To

श्रीकांत दत्तात्रय तनपुरे

An Recognation of the Publication of the Paper Entitled

लोकगीतांचा सामाजिक व वाङमयीन अभ्यास

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Editor : Vinay S. Hatole

**Ajanta Prakashan**
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

ISSN 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF-YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS



Volume - VI
Issue - I
August - January
2017-18

Ajanta
Prakashan

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | प्रा. डॉ. विनायक पवार | संत तुकारामांच्या साहित्यातील सामाजिकता | ११८-१२१ |
| २७ | प्राचार्य डॉ. गजानन जाधव | मराठी भाषा व साहित्यातील संशोधनाच्या नव्या दिशा | १२२-१२४ |
| २८ | डॉ. स्मिता शिंदे | उपयोजित इतिहास आणि मूर्तिशास्त्र | १२५-१२९ |
| २९ | प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण | आर्थिक विकासात लघु वित्ताची भूमिका | १३०-१३३ |
| ३० | श्रीकांत दत्तात्रय तनपुरे | लोकगीतांचा सामाजिक व वाङमयीन अभ्यास | १३४-१३७ |
| ३१ | डॉ. विनोद राऊत | नामदेव ढसाळांच्या कवितेचा घाट | १३८-१४२ |


**'जिनिअस'** या सहामयि प्रसिध्द झालेली मते मुख्य संपादक, संपादक मंडळ व सल्लागार मंडळास मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिध्द करण्यात आलेली लेखकाची मते ही त्याची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोध निबंधाची जबाबदारी स्वत: लेखकावर राहील.

हे नियत कालिक मालक, मुद्रक, प्रकाशक विनय शंकरराव हातोले यांनी अजिंठा कॉम्प्युटर अँण्ड प्रिंटर्स, जयसिंगपूरा, विद्यापीठ गेट, औरंगाबाद येथे मुद्रित व प्रकाशित केले.

# ३० लोकगीतांचा सामाजिक व वाङमयीन अभ्यास

श्रीकांत दत्तात्रय तनपुरे
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा.

**उद्दिष्ट्ये**

1. लोकगीताचे स्वरूप समजावून घेणे.
2. लोकगीत निर्मितीच्या प्रेरणांचा शोध घेणे.
3. सांस्कृतिक गोष्टींना नव्याने उजाळा देणे.

**प्रास्ताविक**

भारतातील लोकगीतांची परंपरा फार प्राचीन आहे. समाज अस्तित्वात येऊन त्यांचे सामूहिक जीवन सुरू झाले तेव्हापासूनच लोकगीतांची परंपरा अव्याहतपणे सुरू आहे. प्रभाकर मांडे म्हणतात, जेंव्हापासून लिखित वाङ्मय उपलब्ध आहे तेंव्हा पासूनच्या सगळ्याच वाङ्मयात लोकगीतांचे उल्लेख सापडतात. यावरून असे समजते की, फार पूर्वीपासून लोकगीते समाजात प्रचलित होते. वेद, पुराणे अशा वाङ्मयात लोकगीता संबंधीचे उल्लेख ठिकठिकाणी सापडतात. लोकगीते परंपरेने नित्यनूतन स्वरूप धारण करीत असतात.

लोकगीतातील मिथके, प्रतीके, प्रथा परंपरा, संकेत इत्यादींचा शोध घेऊन ऐतिहासिक, सामाजिक, वाङ्मयीन तथ्ये मांडण्याचा किंवा सांस्कृतिक अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करता येतो. तसेच सांस्कृतिक मानवशास्त्र, भाषाशास्त्र आणि लोकभाषा, समाजशास्त्र, धर्मशास्त्र यासारख्या ज्ञानशस्त्रांचा विस्तार लोकगीतासारख्या साधनसामग्रीच्या आधारे करता येतो. म्हणून लोकगीते किंवा लोकसाहित्य हे प्रभावी साहित्य असल्याचे समजते.

**लोकगीतांची उत्पत्ती**

लोकगीतांची परंपरा प्राचीन आहे. जेंव्हापासून लिखित वाङ्मय उपलब्ध आहे तेंव्हापासूनच्या वाङ्मयात लोकगीतांचे उल्लेख सापडतात. समाजामध्ये विविध लोकगीते रूढ आहेत. "लोकगीतांची परंपरा जुनी असून वैदिक युगातही विविध विधी प्रसंगी गीते गायिली जात असत. पुत्र जन्म, उपनयन विधी विवाहादी प्रसंगी गीते गायिली जात होती. या गीतांना 'गाथा' हा शब्द वापरला जात होता. श्रीमदभागवतातील दशमस्कंधात कृष्णजन्माच्या वेळी स्त्रियांनी एकत्रितपणे गाणी गायिल्याचे उल्लेख आढळतात."[१] वैदिक युगामध्ये आपल्याला लोकगीते गायिलेली दिसून येतात. तसेच तिसऱ्या शतकापासून प्रकृत भाषेत लोकगीते रूढ असल्याचा उल्लेख आढळतो. अपभ्रंशकाळात लोकगीतांचे स्वरूप आणि त्यांची लोकप्रियता ही ब्राम्हण काळापेक्षाही अधिक होती, असे आचार्य हेमचंद्र कृत 'काव्यनुशासनात' संकलित केलेल्या लोकगीतांच्या अवतरणावरून म्हणता येते.

यादवकाळापासून दळणकांडणाच्यावेळी स्त्रिया ओवीगीते गातात, असा उल्लेख सापडतो. सोमेश्वर नृपतीच्या ' मनसोल्लास' या ग्रंथात स्त्रियांच्या ओव्यांचा निर्देश आहे. सोमेश्वराने या ग्रंथात निरनिराळ्या रागतालांची माहिती सांगताना महाराष्ट्रातील बायका कांडतांना ओव्या म्हणतात, असे म्हटले आहे. तसेच महानुभाव वाङ्मयात 'धवळे' यांचे उल्लेख प्रसिद्ध आहेत. अशा प्रकारे आपल्याला वेगवेगळ्या कालखंडात लोकगीते आढळतात.

**लोकगीत संकल्पना**

लोकवाङ्मयाचा बराचसा भाग लोकगीतामध्ये मोडतो. लोकवाङ्मयाची सुरूवातच लोकगीताच्या रूपाने झाली आहे. लोकगीत म्हणजे 'लोकवाङ्मयाचा आत्मा' असे म्हणण्या इतपत लोकगीत लोकवाङ्मयात महत्वाचे ठरते. लोकगीताचे महत्त्व विशद करताना ना.रा.शेंडे म्हणतात, "लोकसाहित्याची जी अनेक अंगे उपांगे आहेत त्यात लोकगीत हे विशेष भरदार अंग आहे. ते तेजस्वी अंग म्हणजे खेडूतांच्या जीवन संस्कृति, रिती-रिवाज आदींचे जिवंत चित्र उमटवणारा अगदी स्वच्छ आरसाच होय."[२] यातून लोकगीतांच्या महत्त्वा बरोबर लोकगीतांचे लोकजीवनातील स्थानही स्पष्ट होते. लोकगीत लोकजीवनातून आकारास येत असले तरी लोकजीवनाला लोकगीतामुळे एक आकार येतो, हेही विचारात घेण्यासारखे आहे.

लोकसाहित्य आणि मानवी जीवन यांच्या इतिहासाचा वेध घेतल्यास त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू वाटतात. लोकसंस्कृतीचे प्रतिबिंबच लोकगीतात उमटलेले पाहावयास मिळते. या लोकगीतांवर प्रत्येक काळाचा प्रभाव पडलेला आहे.

**लोकगीतांचे स्वरूप**

लोकगीत हे जिवंत काव्य असते मराठी लोकगीतांचा भाग असणारी लोकगीतेही लोकांनी लोकांसाठी तयार केलेली गीते असतात, असे म्हणता येते. मानवी जीवनाचे असे एकही अंग नाही की, ज्याचा उल्लेख लोकगीतात नाही. श्रमपरिहार, मनोरंजन धार्मिक विधीचे एक एक अंग म्हणून व मानवी भावभावनांचे, विचारांचे विशेषांचे प्रतिबिंब लोकगीतातून पाहावयास मिळते.

लोकगीतांचा उगम निरक्षरात झालेला असून कर्ता अनामिक असतो, अज्ञात असतो, लोकगीतामधून लोकरूढी परंपरा, लोकविधी, लोकसंकेत यांचे दर्शन घडते. लोकगीतांमुळे आपल्याला त्या त्या प्रदेशाची भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकांची ओळख होते. प्रत्येक प्रदेशातील बोलीभाषा निरनिराळी असते. बोलीभाषेच्या शब्दरूपामुळे आपल्याला भाषेच्या मुळाशी जाता येते. लोकगीतातून घडणारे समजजीवनदर्शन हे व्यापक असते. सखोल असते. तसे समाजाचे हितजोपासणारेही असते. लोकगीतात त्यांच्या भावभावनांचा, त्यांच्या विचारांचा व कल्पकतेचा अविष्कार होत असतो. लोकगीत हे आत्मनिष्ठ असते. स्वानुभवातून आल्यामुळे कधी-कधी गंभीरपणाही आलेला दिसून येतो.

**लोकगीतांच्या प्रेरणा**

लोकगीताच्या प्रेरणा समिश्र स्वरूपाच्या असतात. व्यक्तिगत, सामाजिक आणि कलात्मक या प्रेरणांचा संयोग असतो. समजजीवनातील दीर्घ आणि मौखिक स्वरुपातील अस्तित्त्वामागे प्रामुख्याने सामाजिक स्वरूपाच्याही प्रेरणा असतात. त्यातून मानवी जीवनाच्या सर्व अंगासह लोकगीत अवतरते. म्हणूनच त्यातून

लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. धर्म, भाषा, विधी, प्रथा इत्यादींशी संबंधित असलेल्या कार्याशी लोकगीते निगडीत असतात. व्यक्तीच्या अनुभवातूनच लोकगीतांना प्रेरणा मिळत असते. याशिवाय जे जे एकले, पहिले, अनुभवले त्याचाही आविष्कार लोकगीतांतून होतो. समाजाचे समाजमनाचे आंतरिक भाव प्रकट करण्याच्या उर्मीतूनही लोकगीतांची निर्मिती होताना दिसते. तसेच स्थळ, काळ, व्यक्ति, भाषा यांचाही परिणाम लोकगीतावर होत असतो.

- **लोकगीतातून चित्रित होणारा आशय**

**१ स्त्रीगीता मधून चित्रित होणारा आशय**

स्त्रिया आपल्या भाव-भावना, वेदना, दु:ख, आनंद, नातेसंबंधाची ओढ आपल्या लोकगीतातून व्यक्त करतात. ही फार पूर्वीपासून चालत आलेली परंपरा आहे. "यादव काळापासून दळणकांडणाच्या वेळी स्त्रिया ओवीगीते गातात असा उल्लेख येतो. सोमेश्वर यांच्या 'मनसोल्लास' या ग्रंथात महाराष्ट्राच्या बायका कांडताना ओव्या म्हणतात असे म्हटले आहे. येथून पुढे महाराष्ट्रत निर्माण झालेल्या मराठी वाङ्मयात स्त्रियांच्या मौखिक गाण्याचे अनेक उल्लेख आढळतात. महानुभाव वाङ्मयात 'धवळे' यांचे उल्लेख प्रसिद्ध आहेत. लोकगीते मौखिक परंपरेने चालत येतात या त्यांच्या विशेषामुळे त्यांची परंपरा, लिखित ग्रंथांच्या सामग्रीमध्ये आढळणाऱ्या स्पष्ट-अस्पष्ट उल्लेखावरूनच शोधावी लागते. तरीही जे काही उल्लेख सापडतात त्याआधारे भारतात आणि महाराष्ट्रात लोकगीतांची दीर्घ अशी परंपरा आहे असे म्हणता येते."[३] यावरून असे लक्षात येते की स्त्रीगीतांची परंपरा खूप जुनी आहे. ही परंपरा महाराष्ट्रात आजही चालू आहे. पूर्वी सारखे जास्त प्रमाणात ही गीते गायिली जात नसली तरी विधी, सण, उत्सवाला स्त्रीगीते आजही गायिली जातात. तंत्रज्ञानाच्या युगामुळे लोकगीत गाण्याचे प्रमाण कमी झालेले दिसते. उदा. पूर्वी स्त्रिया जात्यावरती दळण दळत असत परंतु आता हे दळण गिरणीत दळले जाते. तसेच आधुनिककीकरणामुळे मनोरंजनाचे साधने जास्त झाली. त्यामुळे स्त्रिगीताकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते. असे असले तरी स्त्रीगीतांची परंपरा आजही चालू आहे. जेंव्हा स्त्रिया जात्यावरती दळण दळायला बसतील तेव्हा त्यांच्या तोंडून आपोआप गीत गायिले जातात.

स्त्रीगीतांमधून स्त्रिया आपल्या संबंधीत माणसाचे गुण-दोष गातात. उदा. नवरा, सासू-सासरा, मुलगा-मुलगी, भाऊ-बहीण, आई-वडील इ. व्यक्ति विषयी स्त्रिया गीत गाताना दिसतात. स्त्रिया अशा गीतातून आपल्या भाव-भावना प्रकट करतात. या गीतांचा आशय आपल्या संबंधीत व्यक्ति विषयीचे प्रेम किंवा त्या व्यक्तीचे दोष प्रकट करणारा असतो.

'नेनंती जाऊबाई वसरीचा केर भर
बाहेरून येईन तुझा पंत माझा दीर,
आपुण चौघी बहिणी जस चौकीच्या मधी बस
लडाचा बंधू माझा जसा गुलाबी जाभ दिस.'

अशा प्रकारची नाते संबंधाचा आशय असणारी गीते स्त्रिया गातात.

**२ उपासना गीतातून चित्रित होणारा आशय**

आपल्या भारतीय समाजात विविध प्रकारचे धर्म एकत्रित नांदताना दिसतात. वेगवेगळ्या प्रदेशात देवदेवतांची उपासना केली जाते. गोंधळी, पोतराज, वाघ्या-मुरळी, आराधी, वासुदेव, पिंगळा इ. वेगवेगळ्या देवतांचे भगत असलेले पाहायला मिळतात. हे भगत आपल्या देवताची पूजा-अर्चा, प्रचार-प्रसार लोकगीतातून करतात. असे गीते हे भगत गावामध्ये जाऊन गातात व आपल्या गीतातून देवतेचे महत्त्व, देवताची कीर्ती, देवताने केलेले चमत्कार सांगतात. व लोकांच्या मनामध्ये एक वेगळे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. अशा भागतांना लोक भिक्षा देतात या भिक्षेतूनच या भागतांचा उदरनिर्वाह चालतो.

**समारोप**

लोकगीते लोकमनाची सामूहिक स्पंदने असतात. रूढी, परंपरा, विधी याचे दर्शन घडविण्यासाठी समूहाकडून ती अगदी सहज बाहेर पडतात. लोकगीतातून समकालीन समाजव्यवस्थेचे दर्शन घडते. लोकगीतात वेगवेगळे संकेत असतात. लोकगीतांची निर्मिती उत्स्फूर्तपणे होत असते. दळणकांडणासह श्रमपरिहारासाठी, धार्मिक विधीसाठी लोकगीतांची निर्मिती होत असते. नव्या जुन्याचा स्वीकार करत प्राचीन काळापासून लोकगीतांची परंपरा अखंडपणे वाहत आलेली आहे व ती पुढेही अशीच वाहत राहील.

**संदर्भ**

१. मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरूप', परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती:१९७८, पृ.२३६

२. शेंडे ना.रा., 'लोकसाहित्य व लोकसंस्कृति संमेलन', पृ. १६८

३. मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरूप', परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती:१९७८, पृ. २३२